वि.दि.दावा क्र.२३/२०१८ सतिष वि भाउराव   नि.क्र. ३५

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ नाव- सतिष देवराव माटे</u>**

**<u>साक्षीदाराचा पुढील सरतपास वादी तर्फे विद्वान वकील श्री पी. जी चंद्रीकापुरे मार्फत शपथेवर पुन्हा सुरु -</u>**

प्रकरणात मी माझा पुरावा शपथपत्रान्वये सादर केलेला आहे. मला आता ते शपथपत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे.

२. आता मला दि. २७.१२.२०१३ रोजीच्या करारनाम्याची मुळ प्रत दाखविली. ती बरोबर आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच सुलोचना, भाउराव व दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यास **<u>नि. क्र. ३९</u>** देण्यात आला. आता मला वादमिळकतीचा सात बारा उतारा दाखविला. तो बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४०</u>** देण्यात आला. आता मला गावनमुना सात अधिकार अभिलेख पत्र दाखविले. ते बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४१</u>** देण्यात आला. आता मला शेतीचा नकाशा दाखविण्यात आला. ग्राम अधिकारी भिवापुर यांनी दिलेला आहे. ते बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४२</u>** देण्यात आला. आता मला फेर क्र. १२५५ ची प्रमाणीत प्रत दाखवली. ती बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४३</u>** देण्यात आला. आता मला फेर क्र. १२३८ ची प्रमाणीत प्रत दाखवली. ती बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४४</u>** देण्यात आला. आता मला फेर क्र. २८३ ची प्रमाणीत प्रत दाखवली. ती बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४५</u>** देण्यात आला. आता मला फेर क्र. ४५१ ची प्रमाणीत प्रत दाखवली. ती बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४६</u>** देण्यात आला. आता मला फेर क्र. १६२६/३१२ ची प्रमाणीत प्रत दाखवली. ती बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र. ४७</u>** देण्यात आला. १९.१२.२०१३ रोजी मी खात्यातुन तिन लाख रुपये काढले होते. त्या खात्याचे मुळ पासबुक दाखल केले आहे. त्यास **<u>नि. क्र. ४८</u>** देण्यात आला. आता मला दि. ३१.३.२०१८ रोजीच्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखवली. त्यावर वकीलसाहेबांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर

आहे. त्यास **नि. क्र. ४९** देण्यात आला. त्याबाबतच्या दोन पोस्टाच्या पावत्या मला दाखविल्या. त्या बरोबर आहेत. त्यास **नि. क्र. ५० व ५१** देण्यात आला.

**प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर यास्तव न्यायाच्या हितार्थ उलटतपासासाठी तहकुब.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. ०१.०७.२०२५

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड